**<u>प्रेस नोट</u>** **दि.२१/०७/२०१९**

**कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर**

**<u>वेश्या व्यवसायातून राज्य व परराज्यातील गरीब घरातील मुलींची सुटका</u>**

दि.१९/०७/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. गजानन पवार, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना त्यांचे बातमीदारामार्फत गोपनीय बातमी मिळाली की, इसम रॉनी हा गि-हाईकांना वेश्यागमनासाठी स्त्रीया पुरवित असून गि-हाईकांशी तो त्याचे मोबाईलद्वारे गि-हाईकाने वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केल्यास त्यासोबत वेश्यागमनाच्या दराची रक्कम ठरवुन कोरगाव पार्क परीसरात बोलावुन घेऊन तेथे मुलगी दाखवुन ती गि-हाईकास पसंत पडल्यास सदर महिला ही गि-हाईकाकडुन ठरल्याप्रमाणे रक्कम घेऊन वेश्यागमनासाठी ती मुलगी गि-हाईकाच्या ताब्यात देतो, अशी माहिती मिळाल्याने, सदर ठिकाणी जावून कारवाई करणेकामी सदरची बातमी श्री.गजानन पवार, पोलीस निरीक्षक यांनी श्रीमती वैशाली चांदगुडे, सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा व श्री. मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन यांना तात्काळ कळविली व सदर कारवाईकामी संयुक्तिकरीत्या रेडींग पार्टी तयार करून बनावट गि-हाईकद्वारे सापळा रचून सलतना सोसायटी, बंगला नं.डी-३, कोरेगाव पार्क, पुणे या ठिकाणी जावून २३.४० वा. छापा घातला. सदर छापा कारवाईमध्ये दिल्ली येथील गरीब घरातील मुलगी मिळून आली. तसेच सदर गुन्हयाचे तपासामध्ये एक नागपूर, महाराष्ट्र येथील गरीब घरातील मुलगी मिळून आली. सदर पीडित मुलींकडे केलेल्या तपासात वेश्या व्यवसायातील एजंट नामे (१)रॉनी (२) विकी ऊर्फ पियुष उर्फ विक्रम (३)उस्मान (४) रोहित भगवान कांबळे वय-२८ वर्षे,रा.महादेव मंदिराजवळ, काळेपडळ, हडपसर पुणे यांनी सदर पीडित मुलींचे आर्थिक परिस्थीतीचा गैर फायदा घेवून त्यांना जादा पैशाचे आमिष दाखवून, त्यांना वेश्या व्यवसायास प्रवृत्त केले व त्यांचेकडून वेश्या व्यवसाय करवून घेवून, त्यातील मिळणा-या रकमेवर स्वतःची उपजीविका करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सदर गुन्हयाचे तपासात आरोपी नामे रोहित भगवान कांबळे वय-२८ वर्षे,रा.महादेव मंदिराजवळ, काळेपडळ, हडपसर पुणे यास शिताफीने सापळा रचून अटक करण्यात आले आहे व नमूद वेश्या व्यवसायातून सुटका केलेल्या पीडित मुलींना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) पुणे शहर, मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती डॉ. प्रिती टिपरे सो., सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी तसेच गुन्हे शाखा, युनिट-२, पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार, पोलीस अधिकारी व कर्मचारी व सामाजिक सुरक्षा विभागाकडील महिला पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे, पोलीस अधिकारी व स्टाफ यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे